INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# भगवान बुद्ध व महात्मा बसवेश्वर : विचार साम्यता

## (Lord Buddha and Mahatma Basaveshwara: Similarities of Thought)

**नितीनकुमार जानबाजी रामटेके**
E-mail: ramtekenishi@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/05.2025-82278556/IRJHIS2505019

***सारांश*** *:*

*भगवान बुद्ध यांचे कार्य अडीच हजार वर्षापूर्वीचे आहे त्यांचा जन्म इसवी सन पूर्व 563 मध्ये झाला होता. संत बसवेश्वर यांचे कार्य जवळपास 13 व्या शतकातील आहे. भगवान बुद्धांनी प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री, बंधुभाव या गुणांची शिकवण दिली. भगवान बुद्धांना यामुळेच महाकारुणिक म्हटल्या जाते. भगवान बुद्धांनी बुद्धीप्रामाण्यावाद, विवेक बुद्धीने व्यवहार करायला सांगितले. महात्मा बसवेश्वरांना 'दक्षिणेतील बुद्ध' म्हणून आदराने गौरवण्यात येते. भगवान बुद्धांनी सामान्य लोकांपर्यंत धम्म पोहोचावा म्हणून जनसामान्याची भाषा 'पाली' निवडली. महात्मा बसवेश्वरांनी सुद्धा ज्या भाषेमध्ये आपले विचार लोकांपर्यंत पोहचवले ती भाषा जनसामान्यांची भाषा 'कन्नड' होती. त्यामुळे त्यांचे विचार सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचले. भगवान बुद्धा सारखेच महात्मा बसवेश्वर सुद्धा कोणत्याही प्रकारचे बाह्य धार्मिक कर्मकांड, मंत्र-तंत्र याची शिकवण देत नाही. 2500 वर्षापूर्वी भगवान बुद्धांनी पुरुषाच्या तुलनेत स्त्रीला कमी न मानता स्त्री-पुरुष समानतेचा विचार करून स्त्रीला मानवी हक्क प्रदान केले, म्हणूनच त्यांना स्त्री स्वातंत्र्याचे पहिले उदगाते मानतात.बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीला शुद्र समजले जात असे. तिला मोक्ष नाही, असा समज होता. यावर बसवेश्वरांनी विरोध केला. स्त्रीवर अन्याय केल्या जात होता, हे ओळखून त्यांनी स्त्रीला शिक्षित केले, चालते-बोलते केले. आध्यात्मिक उपासनेची परवानगी दिली. हे शोध पत्र भगवान बुद्धांच्या विचारांचा महात्मा बसवेश्वर यांच्या विचारावर प्रभाव असल्यामुळे त्यांच्यात साम्यता आहे असे नमूद करतो.*

***मुख्य शब्द :*** *वर्ण-व्यवस्था, बुद्धीप्रामाण्यावाद, थेरी.*

**प्रस्तावना :**

भारत देश विविधतेने नटलेला देश आहे. यामध्ये विविध जाती धर्म, भाषा, वंश, परंपरा, भौगोलिक प्रदेश आहेत. या विविधतेने नटलेल्या देशामध्ये विविध महात्मे, संत परंपरा, ऋषी मुनी, समाज सुधारक होऊन गेलेत. त्यामध्ये प्रामुख्याने तथागत बुद्ध, तिरुवल्लुवर, गुरु गोरखनाथ, महात्मा बसवेश्वर, संत ज्ञानेश्वर, संत रैदास, गुरु नानक, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, गुरु घासीदास, संत कबीर, राजा राममोहन राय, ई.वी. रामास्वामी नायकर, पेरियार ललई सिंह यादव, बाबू जगजीवन राम, छत्रपती शाहूजी महाराज, ज्योतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, नरेंद्र दाभोळकर

इत्यादी. या सर्वांनी अन्याय, अत्याचार. जुन्या रूढी परंपरा, अंधश्रद्धा, भेदा-भेद, स्त्री-पुरुष असमानता इत्यादी संदर्भात आवाज उठवला. समाजाला योग्य मार्ग दाखविला, समाजाला न्याय मिळवून देण्यात मदत केली.

**प्रस्तुत शोध पत्राची उद्दिष्टे :**

१. भगवान बुद्धांचे व महात्मा बसवेश्वर यांचे कार्य जाणून घेणे

२. भगवान बुद्धाच्या विचाराचा महात्मा बसवेश्वर यांच्या विचारावरील प्रभाव जाणून घेणे.

३ . भगवान बुद्धांचे व महात्मा बसवेश्वर यांच्या विचारातील साम्यता जाणून घेणे.

४. भगवान बुद्धांचे व महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची आजच्या संदर्भात प्रासंगिकता जाणून घेणे.

**प्रस्तुत शोध पत्राची संशोधन पद्धती :** दोन भिन्न प्रदेशातील, दोन भिन्न भाषेतील व दोन भिन्न कालखंडातील दोन महान तत्वज्ञानी भगवान बुद्ध आणि महात्मा बसवेश्वर यांच्या विचारातील साम्यता शोधण्यासाठी तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. ऐतिहासिक विषयक शोध पत्र असल्यामुळे यामध्ये दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**निरीक्षण :**

शालिवाहन शके दहाव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठित वीरशैव कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. त्यांना बसव व बसवण्णा इत्यादी नावाने ओळखल्या जाते. महात्मा बसवेश्वरांचा जन्म ज्या वेळेस झाला त्यावेळेस समाज चार वर्ण, अनेक जाती-उपजातीमध्ये विभागला होता. मनुष्याचे मूल्य त्यांच्या गुणांवरून कार्यावरून नाही तर त्यांच्या वर्ण, जाती, कुळ इत्यादीवरून ठरविल्या जायचे. ब्राम्हणांचे समाजात वर्चस्व होते, धार्मिक, सामाजिक, राजकारण इत्यादी क्षेत्रात त्यांचेच वर्चस्व होते. अस्पृश्य लोकांना गावाबाहेर राहावे लागत होते. अशा कठीण परिस्थितीत अनेक विरोधांचा सामना करून त्यांनी सर्वांना सत्य, करुणा, मानवता, बुद्धीप्रामाण्यवाद, बंधुता, विवेक, सर्व एक समान इत्यादीची शिकवण दिली. त्यांचे असे म्हणणे होते की अस्पृश्याच्या घरासाठी आणि शिवालयासाठी उपयोगात येणारी जमीन एकच आहे. मनुष्याच्या दैनंदिन कामामध्ये उपयोगात येणारे पाणी एकच प्रकारचे आहे मग तो कोणत्याही जाती धर्माचा का असेना.

सर्व संत, महात्मे, समाज सुधारक या सर्वांचे कार्य त्यांच्या कार्यकाळात समाजात होत असलेल्या अन्याय, अत्याचार, भेदाभेद इत्यादी संदर्भात विरोध करून, आवाज उठवून योग्य मार्ग दाखविण्याचा प्रयत्न होता. संत बसवेश्वर यांचे कार्य जवळपास 13 व्या शतकातील आहे. भगवान बुद्ध यांचे कार्य अडीच हजार वर्षापूर्वीचे आहे त्यांचा जन्म इसवी सन पूर्व 563 मध्ये झाला होता, त्यांचे नाव सिद्धार्थ ठेवल्या गेले आणि नंतर गौतम बुद्ध आणि तथागत या नावानी ते प्रसिद्ध झाले. भगवान बुद्धांनी जगाला शांतीचा संदेश दिला. त्यांनी सांगितले की जीवनामध्ये दुख आहे, दुखाला कारण आहे आणि दुखमुक्तीचा मार्ग सुद्धा आहे. दुखाचे मूळ कारण तृष्णा, अपेक्षा आहेत.

भगवान बुद्धांनी जाती-उपजातीची जननी वर्णव्यवस्था, याच्या विरुद्ध पहिल्यांदा क्रांती केली. ते म्हणतात की ब्राम्हण ब्रम्हाच्या मुखातून जन्माला आले हे साफ चुकीचे आहे. ब्राम्हण भगिनी सुद्धा गर्भ धारणा करतात. मुलांना जन्म देतात, त्यांचे पालन-पोषण सुद्धा करतात. त्याचप्रमाणे अन्य तीन वर्णांची मुले सुद्धा आईच्या गर्भातूनच जन्म घेतात. त्यामुळे जन्माने कोणीही श्रेष्ठ कनिष्ठ नाही, असे ते 2500 वर्षापूर्वी लोकांना समजून सांगतात.

भगवान बुद्धांनी प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री, बंधुभाव या गुणांची शिकवण दिली. भगवान बुद्धांना यामुळेच महाकारुणिक म्हटल्या जाते. भगवान बुद्धांनी बुद्धीप्रामाण्यावाद, विवेक बुद्धीने व्यवहार करायला सांगितले. कोणतीही गोष्ट विनाकारण घडून येत नाही त्यामागे कारण असते. प्रत्येक गोष्ट कुणी सांगतय म्हणून विश्वास ठेवू नका, कोणत्या शास्त्रामध्ये लिहिले, आदेश-उपदेश आहे म्हणून डोळे बंद करून विश्वास ठेवू नका तर बुद्धीच्या तराजूमध्ये तोलून स्वीकारायला सांगितले.

महात्मा बसवेश्वरांना परिवर्तन हे व्यक्तीच्या अंत:करणांतून घडवून आणायचे होते. त्यासाठी एक नवी जीवन पद्धती त्यांनी दिली. जेथे शोषण नाही, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ असा कुठलाही भेदाभेद नाही, कुठल्याही प्रकारची विषमता नाही, जाती-जमाती भेद नाही, कर्मकांड नाही, अशा प्रकारची जीवन पद्धत महात्मा बसवेश्वरांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून अस्तित्वात आणून दाखवली. म्हणूनच महात्मा बसवेश्वरांना 'दक्षिणेतील बुद्ध' म्हणून आदराने गौरवण्यात येते.

भगवान बुद्धांनी वर्ण व्यवस्थेला पोषक ब्राम्हणांना आव्हान दिले आणि वर्ण व्यवस्थेपासून उत्पन्न उच्च-नीचतेच्या भावनेवर तगडा प्रहार केला. कोणीही जन्माने लहान-मोठा नाही. प्रत्येक जन स्वतःच्या कर्माने लहान मोठे होतात. भगवान बुद्धांनी अशा वर्ण-व्यवस्थेला सामाजिक अन्यायकारी व्यवस्था सिद्ध केले.

महात्मा बसवेश्वर फक्त महात्मा नाही तर एक समाज सुधारक पण होते. महात्मा बसवेश्वरांच महत्वपूर्ण कार्य 'अनुभव मंडप' ची स्थापना आहे. अनुभव मंडप म्हणजे लोकांची संसद होती. त्यामध्ये 770 लोक होते ज्यात 70 स्त्रियां होत्या. अनुभव मंडपामध्ये सर्व जाती धर्माच्या लोकांचा सहभाग होता. त्यामध्ये लहान-मोठा असा भेद नव्हता. अनुभव मंडपामध्ये वीर-शैव एकत्रित येऊन सामाजिक, आध्यात्मिक समस्यांवर चर्चा करीत आणि वीर शैव मताचा निश्चित मार्ग दाखवीत होते.

बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीला शुद्र समजले जात असे. तिला मोक्ष नाही, असा समज होता. यावर बसवेश्वरांनी विरोध केला. स्त्रीवर अन्याय केल्या जात होता, हे ओळखून त्यांनी स्त्रीला शिक्षित केले, चालते-बोलते केले. आध्यात्मिक उपासनेची परवानगी दिली. बसवेश्वरांच्या कार्यामुळे प्रेरित होऊन नंतर अक्क दहादेवी, राणी महादेवी, मुक्तायका, नागलंबिका आदी अनेक स्त्री संत नावारूपाला आल्या. अबला ही सबला होऊ शकते, हे बसवेश्वरांनी जगाला दाखवून दिले. तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह त्यांच्या पुढाकाराने

घडला. मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुररस ब्राह्मण मंत्र्याची मुलगी कलावती यांच्यात विवाह घडवून आणला. आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला.

भगवान बूद्धांनी भिक्षु संघामध्ये सर्व प्रकारच्या जातीतील व्यक्तीना स्थान दिले. त्यांच्या संघामध्ये जन्मानी नीच मानले जाणारे शूद्र-अतिशुद्रापासूनउच्च कुळातील स्त्री-पुरुषांचासहभाग होता. ते भिक्षु-भिक्षुनी बनून बुद्धांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करीत होते.

2500 वर्षापूर्वी भगवान बुद्धांनीपुरुषाच्या तुलनेत स्त्रीला कमी न मानता स्त्री-पुरुष समानतेचा विचार करून स्त्रीला मानवी हक्क प्रदान केले, म्हणूनच त्यांना स्त्री स्वातंत्र्याचे पहिले उदगाते मानतात. हिंदूधर्मातील जाचक बंधनामुळेआणि पारतंत्र्यामुळेस्त्रीची सर्व बाजूंनी गळचेपी होत होती, सामाजिक आणि धार्मिक बंधनांनीजखळलेल्या स्त्रियांना हिंदूधर्मात अत्याचाराच्या ओझ्याखाली दडपून जावे लागत होते. अशा दुखी कष्टी आणि अन्यायग्रस्त स्त्रियां बौध्द धम्मातील पुरुषांच्याबरोबरीने मिळणाऱ्या समानतेच्या हक्काने बौध्द धम्माकडे आकर्षित झाल्या.

भगवान बुद्धांनी भिक्षुणी संघाच्या रूपाने त्यांना आत्मोन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला. विहाराच्या रूपाने भिक्षुणींनाच नव्हे तर उपासिकांना सुद्धा संघटीतरित्या शिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती केली. दुखाच्या असह्य कोंडमाऱ्यातून आणि मानसिक गुलामगिरीतूनमुक्त होण्याच्या स्त्रियांच्या प्रबळ इच्छाशक्तीने ते प्रभावित झाले आणि त्यांना आपल्या धम्मात, पुरुषाप्रमाणे प्रवज्जेचा अधिकार दिला, त्यामुळे स्त्रीला तिच्या भौतिक आणि मानसिक व्यक्तिमत्वाच्या विकासाची समान संधी दिली व आपले विचार मांडण्याचा हक्क दिला. भगवान बुद्धांनी स्थापन केलेल्या या भिक्षुणी संघातील भिक्षुणींना 'थेरी' असे म्हणतात. या थेरींनी आपल्या जीवन साफल्याचे उल्हासपूर्ण असे हर्षो-उदगार गाथेच्या स्वरूपात काढले आहेत ते ज्या ग्रंथात समाविष्ट केले आहेत त्या ग्रंथाला 'थेरी गाथा' असे म्हणतात. या थेरी गाथा नामक ग्रंथात एकूण 73 बौद्ध भिक्षुणींचे(थेरींचे) उदगार संकलित केले आहेत.

महात्मा बसवेश्वरांनी ज्या भाषेमध्ये आपले विचार लोकांपर्यंत पोहचवले ती भाषा जनसामान्यांची भाषा 'कन्नड' होती. त्यामुळे त्यांचे विचार सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचले. भगवान बुद्धांनी सुद्धा सामान्य लोकांपर्यंत धम्म पोहोचावा म्हणून जनसामान्याची भाषा 'पाली' निवडली. त्या काळात जनसामान्यांना संस्कृत भाषा शिकणे, ऐकणे, बोलणे, वाचण्यास मनाई होती. संस्कृत भाषा ही फक्त ब्राम्हणापर्यंतच सीमित होती. म्हणून आपले विचार पाली भाषेच्या माध्यमाने जनसामन्या पर्यंत पोहोचविले.

भगवान बुद्धा सारखेच महात्मा बसवेश्वर सुद्धा कोणत्याही प्रकारचे बाह्य धार्मिक कर्मकांड, मंत्र-तंत्र याची शिकवण देत नाही. ते मनुष्याला घोर तपस्या करण्यास सांगत नाही, संसारा प्रती आसक्ती किवा अती अनासक्ती पण सांगत नाही तर ते मध्यम मार्ग सांगतात. ते तृष्णा, मोह, लोभ, काम, क्रोध इत्यादीचे दमन करून परोपकार, दुसऱ्याच्याप्रती त्याग, प्रेम आणि करुणा बाळगण्यातच खरा आनंद आहे व आनंद मिळविण्याचे साधन मानतात.

अशाच प्रकारचे विचार बसवेश्वरांचे आहेत. महात्मा बसवेश्वरांनी शिवालाच माता-पिता म्हटले आहे आणि मनालाच ईश्वराचे दास होण्याचे स्थान मानले आहे. त्यांचा मंदिर, मूर्ती पूजा आणि पंडित पूजा यांना सक्त विरोध होता. महात्मा बसवेश्वर ज्योतिष्य आणि प्रत्येक कामासाठी शुभ वेळ पाहणे याच्या विरुद्ध होते. संत बसवेश्वर म्हणत होते की वेद ब्राम्हणाचे जंजाळ आहे, वेद वाचून काय मिळते, शास्त्र ऐकून काही मिळत नाही.

तथागत भगवान बुद्धांनी नितीमत्ता, सदाचार. सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, प्रजातंत्रात्मक शासन पद्धती, त्याग वृत्ती, शांती आणि परस्पर मैत्रीची शिकवण दिली. त्यांनी कर्मकांड, वेद प्रामाणिकता आणि यज्ञामध्ये जनावरांची हत्या करणे अशा गोष्टींना त्यांचा कडाडून विरोध होता.

थोडक्यात सांगता येईल की प्रत्येक संत, महात्मा, समाज सुधारक तत्कालीन समाजाकडे चिकित्सक दृष्टीने पाहतो, काय खर-खोट, काय स्पष्ट-अस्पष्ट, काय तात्पुरत-दीर्घकाळ, काय श्रद्धा-अंधश्रद्धा, काय उचित- अनुचित, काय न्याय-अन्याय इत्यादींचा सखोल अभ्यास, विवेक बुद्धीने विचार करतात आणि निर्णय घेतात. होत असलेल्या अन्याय, अत्याचार, चुकीच्या रूढी-परंपरा, ऊच-नीच इत्यादी संदर्भात ते आपला विरोध प्रदर्शित करतात व समाजाला मार्गदर्शन करतात, त्यांना काय चांगल-वाईट हे सांगतात, त्यांना मार्ग दाखवितात, दिशा देतात व कर्तृत्वाने, विचाराने अमर होतात. तशाच प्रकारे आज काळ जरी बदलला असला तरी देखील समाजात होत असलेले अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, भेदाभेद आजही आहेत. याला प्रत्युत्तर द्यायला, संतांचेविचार मार्गदर्शक ठरू शकतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. मूलजाधव, सुशीला (2012) भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर और भारतीय स्त्री, औरंगाबाद: कौशल्य प्रकाशन
2. प्रसाद, माता (2014) भारत में सामाजिक परिवर्तन के प्रेरणास्रोत, नई दिल्ली : सम्यक प्रकाशन.

**वेबसाईट्स :**

3. https://www.santsahitya.in/mahati-santanchi/sant-basweshwar/
4. https://www.tejaswilekhani.page/2020/04/rBhUiS.html